# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा :- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 07 मे 2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 06 जुलै 2020.
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 24 फेब्रुवारी 2021.
7. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 01 मार्च 2021.
8. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 10 मार्च 2021.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांकः- 15 /03/2021.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 6 मधील महाराष्ट्र शासनाचे आदेशानुसार संदर्भ क्र. 7 अन्वये उस्मानाबाद जिल्ह्यात लॉकडाऊनचा कालावधी दि. 31 मार्च 2021 पर्यंत वाढविण्यात आला आहे. ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्यातील कोविड-19 चा वाढत असलेला प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून संदर्भ क्र. 8 अन्वये घालण्यात आलेल्या निर्बधांमध्ये वाढ करणे अगत्याचे झाले असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार कोविड-19 चा जिल्ह्यात वाढत असलेला प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून संदर्भ क्र. 8 अन्वये घालण्यात आलेल्या निर्बधांमध्ये वाढ करुन फुड कोर्ट्स/रेस्टॉरंट्स/उपाहारगृहे/बार यांना दि. 05 ऑक्टोबर 2020 पासून 50 % क्षमतेने चालू ठेवण्यास देण्यात आलेली परवानगी याद्वारे रद्द करित आहे व खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देत आहे.

1. **जिल्ह्यातील फुड कोर्ट्स/रेस्टॉरंट्स/उपाहारगृहे मध्ये फक्त स्वयंपायकगृह चालु ठेवुन अन्न पदार्थांची घरपोच सेवा (होम डिलीव्हरी) देण्यास सकाळी 9 ते रात्री 9 या वेळेत परवानगी राहील. ग्राहकांना फुड कोर्ट्स/रेस्टॉरंट्स/उपाहारगृहांमध्ये बसून अन्नपदार्थ खाण्याची परवानगी असणार नाही.**
2. **हॉटेल्स (निवासी सेवा असलेले) 50 % क्षमतेने चालू ठेवण्याची परवानगी कायम ठेवण्यात येत आहे. तथापि हॉटेल्स (निवासी सेवा असलेले) मधील उपाहारगृहे/रेस्टॉरंट्स फक्त निवासी**



Scanned by CamScanner

अतिथींकरिताच चालू ठेवता येतील व अतिथींना भोजनकक्षामध्ये जेवण देण्याऐवजी कक्ष सेवा (Room service) व अन्नपदार्थ घेऊन जाणेस (takeaways) परवानगी राहील. याबाबत उपरोक्त संदर्भ क्र. 5 मधील आदेशाचे परिशिष्ट 1 मध्ये नमूद प्रमाणित कार्यपद्धती (SOP) चे पालन करणे बंधनकारक राहील.

3. बार मध्ये सकाळी 9 ते रात्री 9 या वेळेत **केवळ पार्सल सेवा सुरु ठेवण्यास परवानगी राहील.**
4. उस्मानाबाद जिल्ह्यातील नगर परिषद/नगर पालिका/नगर पंचायत हद्दींबाहेरील राष्ट्रीय महामार्गावर व राज्य महामार्गांवर असणारे धाबे 50 % क्षमतेने दररोज 24 तास (24 × 7) चालू ठेवण्यास परवानगी राहील. याबाबत उपरोक्त संदर्भ क्र. 4 मधील नमूद अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 ते 60, महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम 2020 चे नियम 11, साथरोग अधिनियम 1897 तसेच भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 व इतर लागू होणा-या कायदेशीर तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 17.03.2021 पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

( कौस्तुभ दिवेगावकर )
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
6. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
7. विभाग नियंत्रक, रा. प. उस्मानाबाद.
8. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
9. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
10. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
12. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
13. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
14. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
15. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
16. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner